# FAQ

## उद्यान विज्ञान

**प्रश्न 1 :– भेंडीचे अधीक उत्पादन देणारे वाण कोणते ? प्रति हेक्टरी बीयाण्याचे प्रमाण किती आहे ?**

उत्तर 1 :– भेंडीचे अधिक उत्पादन देणारे वाण, अर्का अनामिका, परभणी क्रांती, फूले उत्कर्ष, महाबीज–13 आणि अकोला बहार आहेत. या जातीचे हेक्टरी बीयाणे 8–10 किलो खरीप हंगामा साठी. उन्हाळी हंगामासाठी हेक्टरी 10–15 किलो. सर्व साधारण पणे हेक्टरी 50–75 क्विटंल उत्पादन मिळते.

**प्रश्न 2 :– कांद्याच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती कोणत्या ? हेक्टरी किती बियाणे लागते ?**

उत्तर 2 :–कांद्याच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती पाढंरा कांदा :– अकोला सफेद, फूले सफेद, पूसा पांढरा चपटा पूसा पांढरा गोल.

लाल कांदा :– एन–53, एग्री फाऊंड रेड, बसवंत–780, पूसा रेड, एन–2–4–1 हेक्टरी बीयाण्याचे प्रमाण – 8–10 किलो.

**प्रश्न 3 :– मिरची पिकामध्ये खत व्यवस्थापन कसे करावे ?**

उत्तर 3 :–मिरची साठी मध्यम ते भारी व पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी.

खत व्यवस्थापन :– हेक्टरी 9–10 टन कुजलेले शेणखत जमीनीत मिसळावे मिरचीसाठी कोरडवाहू 50 कि. नत्र व 25 कि. स्फुरद द्यावे. ओलीताच्या मिरची साठी 150 कि. नत्र व 50 कि. स्फुरद आणि 50 कि. पालाशची चार मात्रा समान हप्त्यात म्हणजेच लागवडीच्या वेळी दयावे, व त्या नंतर 4,11 13 आणि आठवडया मध्ये विभागुन दयावी.

**प्रश्न 4 :– संन्र्यावरील डिंक्यारोगाचे नियंत्रण कसे करावे ?**

उत्तर 4 :–संन्र्यावरील डिंक्याच्या प्रभावी नियंत्रणासाठी रोगग्रस्त झाडाची साल निर्जंतूक केलेल्या पटाशीने काढावी व रोगट भाग 1% पोटॅशियम परमँगनेट द्रावणाने निर्जंतूक करावा, व त्यावर बोडौमलम लावावा. (1:1:10) तसेच रोगग्रस्त भागावर रिडोमील किंवा एलीएट (20 ग्रॅम रिडोमील किंवा 20 ग्रॅम एलीएट + 20 लिटर पाणी) ची फवारणी करावी.

**प्रश्न 5 :–विर्दभात लसणाची लागवड केव्हा करावी आणि लसणाचे अधिक उत्पादन देणारे वाण कोणते ?**

उत्तर 5 :–विर्दभात लसणाची लागवड ऑक्टोबर महिण्यात करावी. लसणाचे अधिक उत्पादन देणारे वाण गोदावरी, श्वेता, जी–41, यमुना सफेद आणि जी–282, एग्री फाऊँड पार्वती आहेत.

**प्रश्न 6 :–संन्र्यातील आंबिया बहाराची फळगळ कशी थांबवावी ?**

उत्तर 6 :–संन्र्यातील फळगळ थांबविण्यासाठी संन्र्यावर 2–4–(D 15 पीपीएम) + यूरिया 1% + कार्बेडॉझीम 0.1% प्रति एक लीटर पाण्यात मिसळून सप्टेंबर महिण्यात याची फवारणी करावी आणि GA–3, (15 पीपीएम) + यूरिया 1% + कार्बेडॅझीम 0.1% ची फवारणी प्रति एक लीटर पाणी याप्रमाणे ऑक्टोबर महिण्यात संजिवक करावी.